# प्रत्येक खाजगी विकसकाने किमान एक एसआरए प्रकल्प हाती घ्यावा : डॉ. नितीन करीर



पुणे : पुणे आणि पिंपरी शहरातील सुमारे ४० टक्के लोकसंख्या ही आज झोपडपट्टीमध्ये राहते. हे सारे नागरिक स्वखुशीने झोपडपट्टीत राहत नाहीत. शहराचे सामाजिक स्वास्थ सांभाळायचे असेल तर याही नागरिकांना चांगले राहणीमान आणि सुविधा देणे आवश्यक आहे आणि याचसाठी खाजगी विकासकांनी एसआरए प्रकल्पांकडे वळणे गरजेचे आहे. यासाठी प्रत्येक खाजगी विकासकाने किमान एक एसआरए प्रकल्प हाती घ्यावा, असे मत महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाचे प्रधान सचिव डॉ. नितीन करीर यांनी व्यक्त केले. पुण्यातील नाईकनवरे डेव्हलपर्सच्या 'परिवर्तन' या झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाचे उद्घाटन व सदनिका ग्राहकांना सदनिका हस्तांतरणाचा कार्यक्रम आज डॉ. करीर यांच्या हस्ते झाला, त्यावेळी ते बोलत होते.

नाईकनवरे डेव्हलपर्सचे संचालक हेमंत व रणजीत नाईकनवरे, पुणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरभ राव, क्रेडाई नॅशनलचे अध्यक्ष सतीश मगर, क्रेडाई महाराष्ट्राचे उपाध्यक्ष श्रीकांत परांजपे, शहर अभियंता प्रशांत वाघमारे, म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक पाटील, पुणे महापालिकेचे सभागृह नेते श्रीनाथ भिमाले, मशाल संस्थेचे अध्यक्ष शरद महाजन, 'परिवर्तन' या प्रकल्पाचे वास्तुविशारद संदीप महाजन, नगरसेवक धिरज घाटे, स्मिता वस्ते, सरस्वती शेंडगे, परिवर्तन प्रकल्पातील सदनिकांचे मालक सलीम पटेल, शिवाजी पारिटे व शाहीद पटेल आदी यावेळी उपस्थित होते. दांडेकर पुलाजवळ 'परिवर्तन' आणि आणखी एक प्रकल्प उभारला जात असून या दोन प्रकल्पांमध्ये एकूण ६ इमारती बांधल्या जात आहेत. 'परिवर्तन' प्रकल्पातील एक इमारत पूर्ण झाली असून त्यातील १९२ सदनिका व ७ दुकानांचे हस्तांतरण आज करण्यात आले.